# प्रेस नोट

दिनांक १५.०३.२०२१

| | |
|---|---|
| युनिट | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकांचे नाव, पद व कार्यालय | श्री. योगेश उदयसींग भोकन वय २८ वर्षे पद सहायक अभियंता वर्ग २, महावितरण उपविभाग कार्यालय देऊळगावराजा रा. भगवानबाबा नगर देऊळगावराजा जि.बुलडाणा मुळ रा. तरोडा ता. मोताळा जि.बुलडाणा |
| मागीतलेली लाचेची रक्कम | १५००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५००/— |
| घटनास्थळ | महावितरण उपविभाग कार्यालय देऊळगावराजा |
| घटना तारीख व वेळ | दिनांक १५.०३.२०२१ चे १६.३२ वा |

**थोडक्यात हकिकत :—**

यातील तक्रारदार यांनी मुख्यमंत्री सौर शेती पंप योजनेअंतर्गत केलेल्या कामाच्या पुर्तता अहवालावर सही करण्याचा मोबदला म्हणुन लोकसेवक श्री. भोकन सहायक अभियंता, महावितरण उपविभाग कार्यालय देऊळगावराजा यांनी प्रती अहवाल ५००/— रुपये याप्रमाणे १५००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा घटकाकडे नोंदविली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक १५.०३.२०२१ रोजी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता लोकसेवक श्री. योगेश उदयसींग भोकन वय २८ वर्षे पद सहायक अभियंता वर्ग २, महावितरण उपविभाग कार्यालय देऊळगावराजा यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांना त्यांनी मुख्यमंत्री सौर शेती पंप योजनेअंतर्गत केलेल्या कामाच्या पुर्तता अहवालावर सही करण्याचा मोबदला म्हणुन १५००/— रुपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने सापळा कार्यवाही आयोजीत करण्यात आली असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडुन १५००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारली.

लोकसेवक श्री. योगेश उदयसींग भोकन वय २८ वर्षे पद सहायक अभियंता वर्ग २, महावितरण उपविभाग कार्यालय देऊळगावराजा यांना ताब्यात घेवुन लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. आरोपी लोकसेवक यांनी आपल्या लोकसेवक पदाचा गैरवापर करुन स्वत:साठी पैशाचे स्वरुपातील आर्थिक लाभ मिळविण्यासाठी लोकसेवक पदाला न शोभणारे गैरवर्तन केल्याने त्यांचेविरुध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर कार्यवाही, १) मा.श्री. विशाल गायकवाड, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
२) मा. श्री. अरुण सावंत, अपर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री. संजय चौधरी व सापळा पथकातील स्टॉफ—पोना विलास साखरे, प्रविण बैरागी, पोकॉ जगदीश पवार, चालक पोकॉ मधुकर रगड यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ तसेच टोल फ्री. क्रमांक. १०६४ यावर सपंर्क साधण्याच `आवाहन पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा यांनी केल`आहे.

( संजय चौधरी )
पोलीस उपअधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा

Scanned with CamScanner